# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ११७-२२ दिनांक :- २६/०४/२०२२

## मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिसच्या नावाखाली अश्लिल कृत्य करणा-या ‘स्पा’वर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २५.०४.२०२२ रोजी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाचे वपोनि एस. एस. पाटील यांना गुप्तबातमीदाराकडुन माहीती मिळाली की, गाळा नं.४ एन.जी. इस्टेट, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पूर्व येथील “सोनीया स्पा” नावाच्या स्पामध्ये मसाजच्या नावाखाली ठेवलेल्या मुली सदर ठिकाणी येणा-या गि-हाईकांशी अश्लील चाळे करीत असतात व नमुद मुली करीत असलेल्या कृत्यास सदर स्पाचे चालक /व्यवस्थापक प्रोत्साहीत करीत असतात अशी माहिती मिळाली.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि. श्री. एस. एस. पाटील यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना सदरील स्पामध्ये पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक २५/०४/२०२२ रोजी १६.०० वा. छापा टाकला आसता स्पा मध्ये एक महिला बोगस गि-हाईकाशी अश्लील चाळे करीत असतांना मिळुन आली. तसेच सदर स्पाची महिला चालक यांनी आपसात संगनमत करुन बोगस गि-हाईकास महिला दाखवून मसाज व एक्स्ट्रा सर्व्हिस (अतिरिक्त सेवा) च्या नावाखाली महिलेस बोगस गि-हाईका समवेत पाठवुन सदर महिलेच्या वतीने २,०००/- रु स्वीकारुन सदरच्या कृत्यास प्रोत्साहीत केल्याचे निदर्शनास आल्याने दोन्ही महिला, बोगस गि-हाईकाकडुन स्वीकारलेली रक्कम व इतर कॅश काऊन्टर मधुन जप्त केलेले असे एकुण ३,२००/-रुपयेसह ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत सपोउनि. उमेश हरी पाटील, नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. I २७४/२०२२, भा.द.वि.सं. कलम २९४, ११४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, सपोउनि. उमेश पाटील, सपोउनि.विजय निलंगे, मपोहवा/सुप्रिया तिवले, चालक पोहवा/सम्राट गावडे, नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----ooo----